**प्रेस नोट ता.११/०७/२०२३**

**वाहन/भंगार मालाची चोरी करणारें सराईत गुन्हेगार पोलीसांच्या जाळयात**

**सराईत गुन्हेगारांकडुन दोन रिक्षा व चोंरीचा माल हस्तगत**

**चिखली पोलीस ठाण्याकडील तपास पथकाची कामगिरी**

---

मागील काही महिन्यांपासुन चिखली पोलीस ठाणेच्या हददीमध्ये जास्त प्रमाणात वाहन चोरीचे व माल चोरीबाबत गुन्हे दाखल झाले असल्याने आज दि.१०/०७/२०२३ रोजी हददीमध्ये मा.पो आयुक्त सो यांचे आदेशाने कोंबिंग ऑपरेशन राबवित असताना तपास पथकाचे प्रभारी अधिकारी श्री. राकेश गुमाने, तसेच पोलीस अमलदार पोहवा साकोरे, पो हवा सावंत, पो हवा शिंदे, पोना.राठोड, पोना.सुतार, पोना.पिंजारी, पोना.गायकवाड, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर काटकर, व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राजेंद्र बर्गे, यांच्या मार्गदर्शनाखाली चिखली पोलीस ठाणेच्या हददीमध्ये ची कारवाई करित असताना रात्रौ २२/०० वाजताचे सुमारास विवेस्टा सोसायटीच्या कन्सस्ट्रक्शन साईट समोर, फुटपाथवर पुर्णानगर, चिंचवड, पुणे. याठीकाणी दोन ऑटो रिक्षा अंधारामध्ये संशयीतरित्या पार्क करुन त्याचे जवळ तीन इसम ऑटो रिक्षांमध्ये काहीतरी भरत असल्याचे दिसल्याने सर्व स्टाफने तात्काळ त्यांना आहे त्या स्थितीमध्ये ताब्यात घेवुन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी त्यांची नावे १) दिगंबर काशिनाथ जामदारे, वय १९ वर्षे, रा. बालघरे वस्ती, कुदळवाडी, चिखली, पुणे. २) प्रतिक गुलाब गोडसे, वय २० वर्षे, रा. घरकुल, चिखली, पुणे. ३) वैभव संजय कापरे, वय १९ वर्षे, रा. नेवाळे वस्ती, चिखली, पुणे. अशी असल्याचे सांगीतली व त्यांच्याकडील दोन ऑटो रिक्षा व त्यामध्ये असलेल्या मालाबाबत विचारणा केली असता ते सर्वजण उडवा-उडवीची उत्तरे देवु लागले त्यांचा संशय आल्याने दोन पंच इसमांना समक्ष बोलावुन त्या दोन ऑटो रिक्षाची पाहाणी करुन त्यांचेबाबत खात्री केली असता सदरच्या ऑटोरिक्षा व त्यांचेमध्ये असलेला लोखंडाचे मटेरीयल होते सदर दोन्ही रिक्षा व मालाबाबत अधिक माहीती घेता चिखली पोलीस ठाणेस **१) गुन्हा क्र.४३०/२०२३ भादंवि कलम ३७९ मधील चोरीस गेलेली रुपये २,५०,०००/- किंमतीची एक नवी रिक्षा २) गुन्हा क्र.४३१/२०२३ भादंवि कलम ३७९ मधील चोरीस गेलेली रुपयें ५०,०००/- किंमतीची एक रिक्षा, ३) गुन्हा क्र.४३२/२०२३ भादंवि कलम ३७९ मधील चोरीस गेलेली १,३०,०००/-रु.किं.चा मुददेमाल असा एकुण ४,३०,०००/- रुपये किंमतीचा एकुण मुददेमाल ताब्यात घेवुन एकुण तिन गुन्हयाची उकल करण्यात यश आलेले आहे.**

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त श्री. काकासाहेब डोळे, सहा. पोलीस आयुक्त श्री. बाळासाहेब कोपनर सो , चिखली पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर काटकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राजेंद्र बर्गे, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक, श्री. राकेश गुमाने, पोहवा.११३३/साकोरे,पो हवा/८०३ सावंत, पो हवा/ ७०९ शिंदे, पोना.९६२/राठोड, पोना.१८१३/सुतार, पोना.१८५६/पिंजारी, पोना.१५४६/गायकवाड, या पथकाने केली आहे.

**( श्री. काकासाहेब डोळे, )**
**पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२**
**पिंपरी चिंचवड आयुक्तालय.**

**प्रेस नोट ता.११/०७/२०२३**

**घातक शस्त्राने दहशत निर्माण करणा-या व सार्वजनिक ठिकाणच्या वाहनांची तोडफ़ोड करणा-या सराईत गुंडाच्या आवळल्या मुसक्या**

**चिखली पोलीस ठाण्याकडील तपास पथकाची कामगिरी**

दि ०८/०७/२३ रोजी रात्री चिखली पोलीस ठाणेच्या हददीतील रुपीनगर तळवडे मुख्य बाजारपेठेतील ‘‘मातोश्री गारमेंट’’ नावाचे कपडयाचे दुकानात एकुण सहा अनोळखी इसमांनी घुसुन कोयत्याने दुकानाची तोडफ़ोड करुन दुकानदारास जिवे मारण्याच्या प्रयत्न करुन पळुन गेले होते, तसेच जाताना रुपिनगर मधील मुख्य बाजार्पेठेच्या रस्त्यावर आरडा ओरड करत कोयते फ़िरवत रस्त्यावर पार्क असलेल्या चार चाकी कार व मोटरसायकल याची तोडफ़ोड करुन परीसरात दहशत निर्माण करुन पळुन गेलेले होते. दुकानमालकाने दिलेल्या फिर्यादीवरुन चिखली पो ठाणे गुन्हा नं.**४२८/२०२३ भा.दं.वि. कलम ३०७, ३३७, ४२७, ३४, आर्म ॲक्ट कलम ४(२५) व म.पो.का. अधि. कलम ३७(१)(३) तसेच क्रिमिनल अमेंमेट ॲक्ट १९३२ चे कलम ३ व ७** दाखल करण्यात आलेला होता. चिखली पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने तात्काळ परीसरातील सीसीटीव्ही फुटेज मिळवुन चिखली, ऑटास्किम, निगडी, आकुर्डी, पिंपरी, भोसरी परीसरात सदरचे फ़ुटेज मधिल फ़ोटो व्हायरल करुन ओनळखी आरोपीची ऒळख पटविण्यात यश मिळवले. त्यांची नावे १) रामेश्वर धनराज कांबळे, वय १९ वर्षे, रा. ओटास्किम, निगडी, पुणे. २) विलन ऊर्फ शुभम गजानन खवडे, वय १९ वर्षे, रा. रुपीनगर, तळवडे, पुणे. ३) आदित्य गोरख दुनघव, वय १९ वर्षे, रा. ओटास्किम, निगडी, पुणे. ४) गणेश परमेश्वर उबाळे, वय १८ वर्षे, रा. ओटास्किम, निगडी, पुणे.५) ओंकार शहाजी चंदनशिव, वय २० वर्षे रा सहयोगनगर, रुपीनगर, तळवडे ६) विशाल शंककर वैरागे वय १९ वर्षे रा ओटा स्किम निगडी अशी निष्पन्न झाल्याने स.पो. नि. गुमाणे याच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र पथक तयार करुन आरोपीचा निगडी, ऒटा स्किम व रुपीनगर परीसरात शोध घेवुन त्यांनी अहोरात्र परिश्रम करुन सर्व आरोपींना ताब्यात घेतले.

तपासात ४ आरोपी हे अल्पवयीन असल्यापासुन गंभीर गुन्हे करत असल्याचे व अल्पवयीन असल्याने त्याना कायद्याने अभय मिळालेले असल्याने त्यांना कायद्याची भिती नसल्याचे निष्पन्न झालेले आहे. अटक आरोपींना त्यांनी गुन्हा केलेल्या ठिकाणी तपासात नेले असता परीसरातील नागरिकांनी पोलीस कामगिरीबाबत समाधान व्यक्त करुन पोलीसांचा सत्कार केला. अटक आरोपी हे सध्य स्थिती प्रोढ झालेले असल्याने त्याच्याविरोधात कठोरात कठोर कारवाई करण्याचे अश्वासन चिखली पोलीस स्टेशनचे वरीष्ट पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर काटकर यांच्याकडुन नागरिकांना देण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त श्री. काकासाहेब डोळे सो.,सहा. पोलीस आयुक्त श्री. बाळासाहेब कोपनर सा़ो , चिखली पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर काटकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राजेंद्र बर्गे, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक, श्री. राकेश गुमाने, पोहवा.११३३/साकोरे,पो हवा/८०३ सावंत, पो हवा/ ७०९ शिंदे, पोना.९६२/राठोड, पोना.१८१३/सुतार, पोना.१८५६/पिंजारी, पोना.१५४६/गायकवाड, पोशि/३३८९ भोर या पथकाने केली आहे.

**( श्री. काकासाहेब डोळे, )**
**पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२**
**पिंपरी चिंचवड आयुक्तालय.**